## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
### गाभा समिती प्रस्ताव संकेतस्थळावर भरण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना मार्गदर्शक सूचना

१) गाभा समितीसाठी स्वयंसेवी संस्थांनी ऑनलाईन प्रस्ताव www.maa.ac.in या संकेतस्थळावर गाभा समिती या टॅब अंतर्गत https://maa.ac.in/index.php?tcf=gabha samiti या लिंकवर विहित नमुन्यात सादर करणे **अनिवार्य** आहे. कोणत्याही स्थितीत प्रत्यक्ष (ऑफलाईन) प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

२) प्रस्ताव विषय विभागास ई-मेल द्वारे किंवा आवक जावक विभागास परस्पर सादर करु नयेत ते स्वीकारले जाणार नाहीत.

३) संबंधित संस्थेने शासनाचे अधिकृत संकेतस्थळ विद्यांजली २.० https://vidyanjali.education.gov.in या पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे.

४) स्वयंसेवी संस्थांनी प्रस्ताव सादर करताना तो एकाच विभागाशी संबंधित व एकाच बाबी / विषयावर आधारित असल्याची खात्री करावी.

५) स्वयंसेवी संस्थांनी प्रस्तावात स्वयंसेवी संस्थेचे पूर्ण नाव, कार्यालयाचा पत्ता, संपर्क अधिकारी यांचा मोबाईल क्रमांक, संस्थेचा ई मेल आय.डी. अचूक दयावा.

६) संस्था कोणत्या कार्यक्षेत्रात काम करु इच्छिते ते नमूद करताना जिल्हा व तालुक्यांची नावे आणि देता येत असल्यास शाळा किंवा विद्यार्थी संख्या नमूद कराव्यात.

७) उपक्रम मंजूर अटी-शर्ती व कार्यक्षेत्रात राबविण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.

८) उपक्रम राबविताना शासन, शाळा, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांचेवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही याची दक्षता संबंधित संस्थेने घ्यावी.

९) उपक्रमासाठी अपेक्षित असणा-या शाळा कोणत्या व्यवस्थापन (शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था उदा. जिल्हा परिषद / महानगरपालिका / नगरपालिका) / अनुदानित / अंशतः अनुदानित (प्राथमिक / माध्यमिक) प्रकाराच्या आहेत हे सुध्दा नमूद करणे आवश्यक आहे.

१०)संकेतस्थळावर प्रस्तावासाठी भरलेली माहिती ग्राहय धरण्यात येईल.

११)संस्थेने प्रस्तावात नमूद केलेल्या उपक्रमात सहभागी व्यक्तींची संख्या व त्यांची शैक्षणिक अर्हता देणे आवश्यक आहे.

१२) संस्थेने उपक्रमासाठी तयार केलेले घटकसंच / मोडयूल / शैक्षणिक साहित्य हे मराठी भाषेत सुध्दा माहिती, तपासणी व निरीक्षणासाठी संबंधित विभागास सादर करणे आवश्यक आहे.

१३) संकेतस्थळावर परिपूर्ण माहिती सादर केली नसल्यास सादरीकरण करण्यास परवानगी देता येणार नाही व सादरीकरणास बोलविण्यातही येणार नाही.

१४) सादरीकरणासाठी संस्थेस कमाल ६ मिनिटे व ४ मिनिटे चर्चेसाठी असे वेळेचे बंधन राहिल त्यामुळे पूर्व तयारी करुन येणे आवश्यक आहे.

१५) संस्थेने ऑनलाईन प्रस्ताव सादर केला नसल्यास कोणत्याही परिस्थितीत गाभा समिती बैठकीत सादरीकरण करता येणार नाही याची नोंद घ्यावी. याबाबत कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१६) उपक्रमास दिलेली मान्यता आवश्यकतेनुसार केंव्हाही रद्द करण्याचे अधिकार मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे तथा अध्यक्ष, गाभा समिती यांचेकडे राहतील.

१७) उपक्रमास दिलेली मान्यता संबंधित शैक्षणिक वर्षाकरिता राहिल. आपल्याला एकापेक्षा जास्त वर्षांसाठी परवानगी हवी असल्यास तसे प्रस्तावात नमूद करावे.

१८) ज्या संस्थांना तीन वर्षांचा सामंजस्य करार (MOU) करावयाचा असेल (मान्यता असेल) त्या संस्थांनी राबविलेल्या उपक्रमाच्या परिणामकारकतेचा (impact) त्रैमासिक अहवाल संबंधित जिल्हयाचे प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व शिक्षणाधिकारी यांच्या मान्यतेने संबंधित विभागास सादर करणे आवश्यक आहे. तसेच, प्रत्येक वर्षी गाभा समितीत अंतिम अहवाल सादर करुन पुढील शैक्षणिक वर्षासाठी मान्यता घेणे आवश्यक आहे.

१९)गाभा समिती बैठकीची तारिख निश्चित झाल्यानंतर एक आठवडा आधी संकेतस्थळावरील ऑनलाईन लिंक बंद करण्यात येईल. तसेच, परिपूर्ण प्रस्ताव सादर केलेल्या संस्थांना सादरीकरणासाठी अंदाजे एक आठवडा आधी ई मेल / दूरध्वनी संदेशा द्वारे कळविण्यात येईल.

२०) मान्यता मिळालेल्या प्रस्तावांसाठी शाळांची / शिक्षकांची निवड ही संबंधित जिल्हयाचे प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थेतील शिक्षण विभागाचे अधिकारी संस्थांशी चर्चा केल्यानंतरच करण्यात येईल.

२१) मुख्याध्यापक हे संबंधित शाळेत मान्यता प्राप्त उपक्रम राबविण्यासाठी सनियंत्रकाचे कामकाज पाहतील.

२२) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत मान्यतेचे पत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्थेने त्वरीत शाळा / शिक्षक निवडीसाठी प्रस्ताव संबंधित जिल्हयाचे प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थेतील शिक्षण विभागाकडे दाखल करावा. अशा प्रस्तावांवर संपूर्ण प्रक्रिया प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून दोन आठवडयात पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांची राहील. यासाठी आवश्यक ते सनियंत्रण त्यांनी करावे.